सन २०१८-१९ करीता जिल्हा वार्षिक आदिवासी घटक कार्यक्रम तयार करणेबाबत <u>मार्गदर्शक तत्वे व कालबध्द कार्यक्रम...</u>

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन परिपत्रक, क्रमांकः टिएसपी-२०१७/प्र.क्र.२१७/का.६**
विस्तार इमारत, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२.
दिनांक: १६ ऑक्टोबर,२०१७.

<u>वाचा -</u>

1. **शासन परिपत्रक, नियोजन विभाग, क्रमांकः डिएपी १०१७/प्र.क्र.१४०/का-१४८१, दि.०६.१०.२०१७.**
2. **शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांकः टिएसपी-२०१७/ प्र.क्र.२१९ /का-६, दि.१३.१०.२०१७.**

<u>परिपत्रक-</u>

शासन निर्णय, दिनांक २१.९.१९९२ अन्वये आदिवासी उपयोजना तयार करण्याच्या व राबविण्याच्या कार्यपध्दतीमध्ये शासनाने १९९३-९४ पासून धोरणात्मक बदल केले असून, त्यानुसार राज्याची आदिवासी उपयोजना तयार करण्याची पूर्णत: जबाबदारी आदिवासी विकास विभागाकडे दिलेली आहे. यात अंशिक बदल करण्यात आले असून विभागाच्या दिनांक १६ डिसेंबर, २००९ च्या शासन निर्णयानुसार जिल्हा वार्षिक योजना तयार करण्याची जबाबदारी संबंधित जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. वित्त विभागाच्या दिनांक २७.०१.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये आर्थिक वर्ष सन २०१७-१८ पासून योजनांतर्गत व योजनेतर खर्चाचे एकत्रिकरण करणेबाबतचा निर्णय घेण्यात आला असून या अन्वये अर्थसंकल्पिय खर्चाचे यापुढे “अनिवार्य खर्च”, “कार्यक्रमांवरील खर्च” तसेच “महसूली”व “इतर (भांडवली व ऋण) खर्च” याप्रमाणे वर्गीकरण दर्शविण्यात येणार आहे. तसेच या शासन निर्णयानुसार सन २०१७-१८ पासून आदिवासी उपयोजनेस (Tribal Sub-plan) आदिवासी घटक कार्यक्रम (Tribal Component Schemes) असे संबोधण्यात येणार आहे. त्यानुसार आर्थिक वर्ष सन २०१८-१९ करीता आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत जिल्हा वार्षिक योजना ( जिल्हा वार्षिक आदिवासी घटक कार्यक्रम) तयार करण्यासाठी खालीलप्रमाणे मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात येत आहेत.

२. आदिवासी घटक कार्यक्रम हा राज्याच्या वार्षिक योजनेचा एक भाग असून वार्षिक आदिवासी घटक कार्यक्रम तयार करणे हे वार्षिक योजनेच्या कार्यक्रमाशी पूरक आहे. सन २०१८-१९ च्या जिल्हा वार्षिक आदिवासी घटक कार्यक्रमाचे प्रारुप आराखडे संबंधित प्रकल्प अधिकारी यांनी जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा करुन तयार करावेत व ते आदिवासी उपयोजना समिती/जिल्हा नियोजन समितीच्या मान्यतेसाठी सादर करावेत.

३. आदिवासी उपयोजनेचा जिल्हा वार्षिक आराखडा तयार करण्याकरिता खालील मार्गदर्शक तत्वांचे काटेकोरपणे पालन करावे :-

१) संदर्भाधीन क्र. २ येथील दिनांक १३.१०.२०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत विभागास एकूण प्राप्त नियतव्यय वाटपाचे सूत्र ५% पेसा क्षेत्रातील ग्रामपंचायतींना थेट

अनुदान, ४०% जिल्हास्तर योजना व ५५ % राज्यस्तर योजना करिता असे निश्चित करण्यात आले आहे.त्यानुसार दरवर्षी प्राप्त होणाऱ्या नियतव्ययाच्या मर्यादेत वार्षिक आराखडे तयार करणे बंधनकारक राहील. **तथापि, सन २०१८-१९ आर्थिक वर्षाकरीता राज्य योजनेचे आकारमान अजूर निश्चित झालेले नसल्याने सद्यस्थितीत नियोजन विभागाने गतवर्षा एवढाच नियतव्यय उपलब्ध करून दिलेला असल्याने त्यानुसार सन २०१८-१९ करिता जिल्हा वार्षिक उपयोजनेस चालू आर्थिक वर्षाइतकाच नियतव्यय संरक्षित करण्यात येत आहे**.त्यानुसार **"परिशिष्ट -अ"** प्रमाणे नियतव्यय वाटप प्रस्तावित करण्यात येत आहे.

२) त्यानुसार आदिवासी उपयोजना क्षेत्र (TSP) व आदिवासी उपयोजनेबाहेरील क्षेत्र (OTSP) करिता सोबत जोडलेल्या **"परिशिष्ट-ब"** व **"परिशिष्ट-क" मध्ये** दर्शविलेल्या नियतव्ययाच्या मर्यादेत जिल्हा वार्षिक आराखडा तयार करण्यात यावा.

३) यासोबत जोडलेल्या **"परिशिष्ट - ड"** प्रमाणे प्राप्त नियतव्ययाचे विकास क्षेत्रनिहाय (Sectorwise) आवंटन/ वाटप विभिन्न विभागामध्ये करण्यात यावे.

४) शिक्षण, आरोग्य, जलसंधारण, रस्तेविकास इत्यादि विकास क्षेत्रनिहाय निधीवाटप निश्चित करताना या क्षेत्रातील यापूर्वीचे अपेक्षीत साध्य, फलनिष्पत्ती, प्रस्तावित बदल इत्यादि अनुषंगीक बाबी विचारात घेऊन त्यांच्या पुर्ततेसाठी आदिवासी उपयोजना व सर्वसाधारण क्षेत्र योजना याखाली जिल्ह्यास विविध योजनांतर्गत प्राप्त होऊ शकणाऱ्या निधीचे नियोजन एकत्रितपणे विचारात घेऊन करण्यात यावे. तसेच नाविन्यपूर्ण किंवा अन्य अबांधील स्वरूपातील निधीच्या माध्यमातून अस्तित्वात असलेल्या योजनांमधून करता न येणाऱ्या कामांसाठी/ योजनांसाठी सदरचा निधी गॅप फिलींग म्हणून वापरण्यात यावा. शक्यतो एकाच प्रकारच्या कामासाठी कोणत्याही परिस्थितीत दोन वेगवेगळया योजनांच्या माध्यमातून वेगवेगळयाने निधी उपलब्ध होणार नाही याची दक्षता जिल्हा नियोजन समितीने घ्यावी. मात्र काही कामांसाठी केंद्र पुरस्कृत योजनांद्वारे निधी मिळत असल्यास त्यामधुन अशी कामे प्रस्तावित करून उर्वरित कामांसाठी राज्यशासनाकडून विविध स्त्रोताद्वारे जिल्हयास उपलब्ध होणाऱ्या निधीचे एककेंद्राभिमुखता (Convergence) पध्दतीने नियोजन करुन फलनिष्पत्ती दायक अंमलबजावणी आराखडा तयार करावा.

५) जिल्हा वार्षिक योजना या **"परिशिष्ट-ब"** मध्ये दिलेल्या कमाल नियतव्ययाच्या मर्यादेतच असाव्यात. योजनेंतर्गत करावयाच्या कामांच्या याद्याही आराखड्यासोबत असणे बंधनकारक आहे.

६) **जिल्हा नियोजन समिती व राज्यस्तरीय बैठकीसाठी तयार करण्यात येणारा जिल्हा योजनेचा आराखडा कार्यान्वयीन यंत्रणांनी योजना माहिती प्रणालीमध्येच (MP- SIMS) सादर करणे बंधनकारक राहील. त्याशिवाय बैठका घेवून नियतव्यय अंतीम करून अर्थसंकल्पित करण्यात येणार नाही.**

७) आदिवासी उपयोजना क्षेत्रातील प्रकल्प घेण्यासाठी सर्व प्रकल्पाचे कार्यक्षेत्र पूर्णरित्या आदिवासी उपयोजना क्षेत्रामध्ये आहे किंवा कसे याबाबत जिल्हाधिकारी यांनी स्वत: खात्री करावी. आदिवासी उपयोजना क्षेत्राकरिता केलेली तरतूद आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील योजनेमध्ये खर्च करता येणार नाही याची काळजी संबंधित जिल्हाधिकारी यांनी घ्यावी.

८) संबंधित विभाग प्रमुखांनी प्रस्तावित कामे आदिवासी उपयोजना क्षेत्रातील आहेत याबाबतचे प्रमाणपत्र प्रशासकीय मान्यतेच्यावेळी स्वत:च्या स्वाक्षरीने अंदाजपत्रकासोबत जोडावे व जिल्हाधिकारी यांनी प्रशासकीय मान्यता देताना असे प्रमाणपत्र असल्याशिवाय प्रशासकीय मान्यता देऊ नये.

९) आदिवासी क्षेत्रासाठी उपलब्ध करुन दिलेला नियतव्यय बिगर आदिवासी क्षेत्रावर खर्च झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी जिल्हास्तरावरील विभागप्रमुख व जिल्हाधिकारी यांची राहिल व याबाबत संबंधित विभागप्रमुख यांच्यावर कडक प्रशासकीय कारवाई करण्यात येईल.

१०) सन २०१७-१८ पासून जिल्हास्तरावरील निधी अर्थसंकल्पित करण्याच्या अनुषंगाने झालेल्या बदलानुसार आता वित्त विभागाने वेतन या उद्दीष्टांकरिता (०१-वेतन, ३६-सहायक अनुदाने (वेतन)) ऋण देयके (Minus) मंजूर करणे बंद केलेले आहे. म्हणजेच या पूढे BEAMS/ SEVAARTH प्रणालीवर वेतनाची देयके वेतनासाठी एकूण अर्थसंकल्पीत निधीच्या मर्यादेपेक्षा जास्त निघणार नसल्याने अंमलबजावणी यंत्रणेची यासंबंधातील एकूण मागणी व खर्च लक्षात घेवून त्याकरीता पूरेशी तरतूद करावी.

११) विविध योजनांच्या संदर्भात प्रकल्प अधिकाऱ्यांनी त्यांच्या प्रकल्प क्षेत्रात दौरे करुन क्षेत्रीय पातळीवरील अंमलबजावणी अधिकाऱ्यांशी चर्चा करावी व त्यानुसार आदिवासी क्षेत्रातील नेमकी गरज लक्षात घ्यावी व नेमक्या कोणत्या योजना घेण्याची आवश्यकता आहे हे निश्चित करावे. असे करताना ज्या भागात सदर योजना राबवावयाची असेल त्या भागातील मोठ्या संख्येने लाभार्थ्यांना लाभ मिळेल अशा कामांना सर्वप्राथम्य द्यावे व त्यांची गरज भागविल्यानंतर त्यापेक्षा कमी लोकसंख्येला लाभदायी ठरणाऱ्या योजनांचा अग्रक्रम द्यावा.त्या करिता खालील मार्गदर्श सूचना विचारात घेण्यात याव्यात.

**अ) <u>कामांची निवड -</u>**

I) कामनिहाय नियोजन होण्यासाठी जिल्हा योजने अंतर्गत घेण्यात येणाऱ्या सर्व कामांची यादी व त्यावरील खर्चाचा तपशील प्रस्तावासोबत जोडावा. तसेच तो योजना प्रणाली (MP-SIMS) मध्येही भरण्यात यावा. सामान्यत: कोणत्याही योजनेला त्या योजनेअंतर्गत घ्यावयाची कामे निश्चित असल्याशिवाय नियतव्यय ठेवण्यात येवू नये व याची सर्वांनी काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. कामांच्या याद्यांशिवाय निधी अर्थसंकल्पीत करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

II) **जिल्हा वार्षिक योजनेतून घेण्यात येणारी कामे २ वर्षाच्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक आहे.** त्यादृष्टीने कामाचे नियोजन तसेच निधीची तरतूद करण्यात यावी. योजनेचा आराखडा तयार करताना चालू कामांच्या उर्वरीत खर्चाच्या तरतूदीबाबत प्राथम्याने विचार करण्यात यावा. अपूर्ण कामांमध्ये ७५% व त्यापेक्षा अधिक पूर्ण, ५०% ते ७४% पूर्ण व ५०% पेक्षा कमी पूर्ण असे वर्गीकरण करुन त्याक्रमाने कामे पूर्ण करण्याचे नियोजन करावे, जेणेकरुन वितरीत निधी अखर्चीत राहणार नाही.

III) **जिल्हा आराखड्यात प्रस्तावित केलेल्या नियतव्यय मर्यादेतून अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी लागणारा निधी वजा करुन उर्वरीत नियतव्यय रक्कमेच्या दीड पट रक्कमेच्या मर्यादेतीलच नवीन कामे प्रस्तावित करण्यात यावीत.** नवीन कामे/ बांधकामांचा समावेश योजनेत करण्यापूर्वी अशा कामांच्या प्राथमिकता ( आवश्यक तेथे शासनाची मान्यता किंवा जागेची उपलब्धता इ.) पूर्ण झाले आहेत व प्रस्तावित नियतव्यय खर्च होईल हे निश्चित झाल्यानंतर ती कामे समाविष्ट करावीत.

IV) अपूर्ण कामे जास्त प्रमाणात असल्यास, त्याचा आढावा घेण्यात यावा. स्थानिक गरजेनुसार अशा कामांचा प्राथम्यक्रम ठरवून प्राथम्यानुसार त्या कामांना निधी देण्यात यावा. तसेच कमी प्राथम्याच्या कामाबाबत सुरक्षित मर्यादेपर्यंत खर्च करुन अशा कामांना पुनर्विनियोजनाने निधी देण्यात यावा. उर्वरीत कामे थांबविण्यात यावीत.

**आ) केंद्र पुरस्कृत योजना-**

I) **सन २०१६-२०१७ या वर्षापासून विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीच्या सर्व योजना जिल्हास्तरावर वर्ग करण्यात आलेल्या आहेत.** यामुळे या योजनांकरीता आवश्यक नियतव्यय जिल्हा नियोजन समितीकडे प्रस्तावित करण्याची जबाबदारी त्या जिल्ह्यातील संबंधित सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प व जिल्हाधिकारी यांची राहील.

II) **जिल्हास्तरावर** सोपविण्यात आलेल्या केंद्र पुरस्कृत योजनांना आवश्यक राज्य हिश्श्याकरीता नियतव्यय प्रस्तावित करण्याची दक्षता संबंधित योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या विभागाचे जिल्हा प्रमुख व जिल्हाधिकाऱ्यांनी घ्यावी.

**इ) महत्त्वपूर्ण राज्य योजना :**

**I)** राज्य शासनाने काही महत्त्वपूर्ण योजना सूरू केलेल्या आहेत, उदा. डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम आहार योजना, अंगणवाडीतील मुलांना अंडी व केळी वाटप, ग्राम बालविकास केंद्र इ. योजनांकरीता राज्यशासनाने जिल्हानिहाय विहित करून दिलेली तरतूद प्राधान्याने करण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी यांची राहील.

**II)** शासकीय आश्रमशाळा व वसतीगृहांच्या सुविधांबाबत वेळोवेळी न्यायालयीन प्रकरणे उद्भवतात. यानुषंगाने आश्रमशाळा व वसतीगृहांना प्राथम्याने मुलभूत सुविधा पुरविण्याचे वेळोवेळी निर्देश दिलेले आहेत. तसेच वॉश कार्यक्रमांतर्गत पाणीपुरवठा, शौचालय दुरूस्ती, स्नानगृह दुरूस्ती , आश्रमशाळा कायापालट अशी सर्व अनुषंगिक कामे आश्रमशाळांमध्ये पूर्ण करावयाची आहेत. त्या बाबींचा विचार करता ज्या शासकीय आश्रमशाळा व वसतीगृहांना जिल्हा उपयोजनेतून निधी उपलब्ध करून देण्यात येतो त्यांना एकुण सोयी सुविधा पुरविण्याबाबत तसेच त्यांच्या एकुण निधी मागणीस अनुसरून प्राथम्याने व जास्तीत जास्त निधी उपलब्ध करून द्यावा.

**ई) नाविन्यपूर्ण योजना-**

I) सदर या सदराखाली घेण्यात येणाऱ्या योजना या प्रशासन/ विकास कामे या क्षेत्रातील प्रायोगिक स्वरुपाच्या (Pilot Projects) असाव्यात. कोणत्याही परिस्थितीत केंद्र अथवा राज्यस्तरावर सद्यस्थितीत अस्तित्वात असलेल्या कोणत्याही योजनांना नाविन्यपूर्ण योजनांमधून तरतूद उपलब्ध करुन देण्यात येवू नये. नाविन्यपूर्ण किंवा अन्य अबांधील स्वरूपातील निधीच्या माध्यमातून अस्तित्वात असलेल्या योजनांमधून न करता येणाऱ्या कामांसाठी/ योजनांसाठी सदरचा निधी गॅप फिलींग म्हणून वापरण्यात यावा. शासकीय आश्रमशाळां Digital करणे यासारख्या योजना यामधून प्राधान्याने घेण्यात याव्यात.

II) नाविन्यपूर्ण योजनांच्या बाबतीत मागासवर्गीय कल्याण विकास शिर्षाशी संबंधित योजनांना अपर आयुक्त, आदिवासी विकास यांचेमार्फत आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांची तांत्रिक व प्रशासकीय मान्यता घेण्यात यावी .तसेच इतर विभागाशी संबंधित योजनांना तांत्रिक व प्रशासकीय मान्यता संबंधित नियंत्रक अधिकाऱ्यांकडून घेण्यात यावी. नाविन्यपूर्ण (नवीन योजना) योजनेसाठी परिपूर्ण प्रस्तावास मान्यता घेऊन त्यास आदिवासी विकास विभागाची व संबंधित विभागाची मान्यता घेण्याची जबाबदारी सर्वस्वी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहिल. त्या योजनेस आदिवासी विकास विभागाची मान्यता मिळाल्यानंतर व सदर योजनेसाठी लेखाशिर्ष

उपलब्ध झाल्यानंतरच या नवीन योजनेसाठी आदिवासी घटक कार्यक्रमामध्ये तरतूद अर्थसंकल्पीत करण्यात येईल.

उ) <u>**आदिम जमाती/ पारधी विकास योजना-**</u>

ज्या जिल्ह्यात आदिम जमातीच्या लोकांची वस्ती आहे, अशा जिल्ह्यात उदा. ठाणे, पालघर व रायगड जिल्हा (कातकरी), गडचिरोली जिल्हा (माडीया गोंड), यवतमाळ व नांदेड जिल्हा (कोलाम) या जिल्ह्यातील आदिवासी उपयोजना नियोजन समितीने या आदिम जमातीच्या जलद विकासाकरीता वैयक्तिक अथवा कौटुंबिक लाभाच्या योजनांची तसेच मुलभूत विकासाच्या योजनांची आखणी करुन त्याकरीता त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात अग्रक्रमाने आवश्यक नियतव्यय जिल्हा आदिवासी उपयोजनेत उपलब्ध करुन द्यावा. त्याचप्रमाणे आदिम जमातीकरिता केलेल्या तरतुदींची योजनावार माहिती “एका परिशिष्टात” स्वतंत्ररित्या जोडून आदिवासी उपयोजनेच्या आराखड्याबरोबर शासनाला सादर करावी. सदर बाबतीत गांभिर्याने कार्यवाही करावी.

**तसेच** पारधी जमातीच्या विकासाकरीता, त्यांची जिल्हयातील लोकसंख्या विचारात घेवून त्या प्रमाणात त्यांच्या विकासासाठी असलेल्या कार्यक्रमासाठी आवश्यक तरतूद प्राधान्याने आदिवासी घटक कार्यक्रमामध्ये समाविष्ठ करावी. पारधी जमातीकरिता केलेल्या तरतुदीची योजनावार माहिती एका परिशिष्टात स्वतंत्ररित्या जोडून जिल्हा आदिवासी उपयोजनेच्या आराखड्याबरोबर शासनाला सादर करावी.

४. सन २०१८-२०१९ चा जिल्हा वार्षिक आदिवासी घटक कार्यक्रम हा शासनाने दिलेल्या नविन मार्गदर्शक तत्वांनुसार तयार करावयाची आहे. अंदाज समितीने त्यांच्या चौदाव्या अहवालातील शिफारशीला अनुलक्षून विधान सभा सदस्यांना त्यांच्या मतदारसंघातील कोणत्या कामासाठी किती तरतूद करण्यात आली याची माहिती मिळावी या हेतूने प्रत्येक योजनेसाठी प्रस्तावित केलेल्या एकूण नियतव्ययाची विगतवारी प्रकल्प क्षेत्रातंर्गत विकास गटनिहाय/ तालुकानिहाय स्वतंत्रपणे दाखविण्यात यावी.

५. जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजना या “परिशिष्ट-ब” मध्ये दिलेल्या कमाल नियतव्ययाच्या मर्यादेत असावी. ज्या जिल्हयामध्ये एकापेक्षा अधिक प्रकल्प कार्यालये आहेत त्यांचेसाठी प्रकल्पनिहाय वाटप “परिशिष्ट-क” मध्ये देण्यात आलेले आहे.

६. जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजना तयार करतांना “परिशिष्ट-ड” मधील मार्गदर्शक तत्वे तसेच शासनाच्या नियोजन विभागाच्या दिनांक ६ ऑक्टोबर,२०१७ च्या परिपत्रकानुसार दिलेल्या सर्वसाधारण सूचना विचारात घ्याव्यात.

७. जिल्हा वार्षिक आदिवासी घटक कार्यक्रमात प्रस्तावित केलेल्या नियतव्ययाची विकासक्षेत्र/ उपक्षेत्र / योजना/ प्रकल्प निहाय, तालुकावार विगतवारी जिल्हा आदिवासी घटक कार्यक्रम / जिल्हा नियोजन समितीच्या सदस्यांना बैठकीपूर्वी उपलब्ध करुन देण्यात यावी.

८. सन २०१८-२०१९ च्या जिल्हा वार्षिक योजनेस राज्यस्तरावर अंतिम स्वरुप देण्यासाठी प्रत्येक जिल्हयाची आवश्यक असलेली माहिती विहित प्रपत्रामध्ये प्राप्त व्हावी म्हणून १ ते ५ विवरणपत्रे विहित केलेली आहेत.

९. आदिवासी घटक कार्यक्रमाची आखणी व अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यासाठी खालील बाबींचा समावेश असलेली स्वयंस्पष्ट टिप्पणी प्रस्तावांच्या छाननी दरम्यान अंमलबजावणी अधिकाऱ्यांच्या मदतीने तयार करुन ठेवावी.

१) रस्त्यांची यादी तयार करावी. यामध्ये जी आदिवासी गावे राज्य मार्गास जोडलेली नाहीत अशा रस्त्यांचा समावेश असावा. तसेच आदिवासी क्षेत्राबाहेरील फक्त माडा व मिनीमाडा मधील रस्त्यांची कामे घेता येतील.

२) तसेच गांवे /वाड्या /पाडे /आश्रमशाळा /प्राथमिक आरोग्य केंद्र इत्यादीसाठी नवीन रस्त्यांची कामे प्रस्तावित करावीत.

३) वैद्यकीय उपलब्ध सुविधा व अनुशेष असल्यास त्याची माहिती.

४) ज्या आदिवासी क्षेत्रातील गावांचे विद्युतीकरण झालेले नाही अशा गावांचा समावेश करावा.सिंचन प्रकल्पांची माहीती-

(अ) प्रकल्पाचे नाव

(ब) प्रकल्प पूर्ण झाल्याचे वर्ष ,अंदाजित खर्च

(क) सुरु असलेल्या नवीन प्रकल्पाची प्रशासकीय मान्यतेनुसार किंमत व आतापर्यंतचा खर्च व अपेक्षित खर्च.

(ड) नव्याने सुरु करावयाचे लघुपाटबंधारे प्रकल्प

५) पाणीपुरवठा योजनेबाबतची सविस्तर माहिती

६) आतापर्यंत आदिवासी उपयोजनेतून सदर जिल्हयामध्ये झालेला खर्च

७) अंमलबजावणी अधिकाऱ्यांच्या काही अडचणी / नवीन प्रस्ताव असल्यास त्याचा तपशिल

८) शासकीय/ अनुदानीत आश्रमशाळा/ वसतीगृहे / शालेय शिक्षण विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शाळा इ. ची सांख्यिकीय माहिती.

९) विशेष केंद्रीय सहाय्य आणि भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५ (१) अंतर्गत राबविण्यात आलेल्या/ येणाऱ्या योजनांबाबतची सांख्यिकीय माहिती.

१०) सन २०१६-१७ चा खर्च व सन २०१७-१८ चा अपेक्षित खर्चाचा विहित नमुन्यातील तपशील.

वरील मुद्दे उदाहरणादाखल आहेत. त्यामध्ये जिल्हातील आदिवासींच्या विकासासंबंधीत आणखी काही उपयुक्त माहितीचा समावेश करणे आवश्यकता वाटल्यास समावेश करण्यात यावा.

१०. सन २०१६-१७ या आर्थिक वर्षापासून काही योजना जिल्हास्तरावरून राज्यस्तराकडे व काही योजना राज्यस्तरावरून जिल्हास्तराकडे वर्ग करण्यात आल्या आहेत. त्यानुसार कार्यवाही करावी.

११. सन २०१७-१८ या आर्थिक वर्षापासून अर्थसंकल्पामधील योजनेतर व योजनांतर्गत असे खर्चाचे वर्गीकरण रद्द होवून नविन प्रणालीमध्ये महसुली खर्च व भांडवली खर्च असे वर्गीकरण करण्यात आलेले आहे. यानुसार, जिल्ह्यांनी यापुढे जिल्हा नियतव्यय वाटपाबाबत, खर्चाच्या अहवालाबाबत तसेच इतर प्रकारचे अहवाल सादर करताना आवश्यक ठिकाणी जिल्ह्याच्या खर्चाचे महसुली खर्च व भांडवली खर्च असे वर्गीकरण सुध्दा दर्शविण्यात यावे.

१२. सर्व संबंधितांना असे सूचित करण्यात येते की, वर उल्लेखिलेल्या मार्गदर्शक सूचना लक्षात घेऊन जिल्हयांच्या योजनांबाबतचा आराखडा सोबत जोडलेल्या “परिशिष्ट- इ” मध्ये दर्शविल्यानुसार विहीत कालावधीत तयार करण्यात यावा. आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत मागासवर्गीयांचे कल्याण या शिर्षाखाली जिल्हा वार्षिक योजना तयार करण्याची व संनियंत्रणाची जबाबदारी आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांचेवर राहिल. तसेच आदिवासी उपयोजनेंतर्गत इतर विकास शिर्षाची जिल्हा वार्षिक योजना तयार करण्याची जबाबदारी

जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव यांच्यावर राहिल. कोणत्याही परिस्थितीत जिल्हा आदिवासी उपयोजना समिती/ जिल्हानियोजन समितीने संमत केलेल्या जिल्हा उपयोजनेच्या प्रस्तावाच्या १० प्रती आदिवासी विकास विभागाकडे व नियोजन विभागाकडे दिनांक १० डिसेंबर, २०१७ पर्यंत पाठवाव्यात. तसेच संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना सुध्दा त्याचवेळेस प्रती पाठविण्याची व्यवस्था करावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१७१०१२१३५८४२४६२४ असा आहे. सदर परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Ravindra Digambarrao Aute

Digitally signed by Ravindra Digambarrao Aute
DN: cn=Ravindra Digambarrao Aute, o=Tribal Development Department, ou=Government of Maharashtra, email=rajendra.aute@nic.in, c=IN
Date: 2017.10.17 15:29:48 +05'30'

**रविंद्र दि.औटे**

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

सहपत्र:- जोडपत्र

प्रती,

सर्व जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती.

प्रत अग्रेषीत

१. मा.राज्यपालांचे सचिव,राजभवन,मलबार हिल,मुंबई
२. मा.मुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव
३. मा.मंत्री (आ.वि.) यांचे खाजगी सचिव
४. मा.राज्यमंत्री (आ.वि.) यांचे खाजगी सचिव
५. मा.सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
६. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
७. सर्व अपर मुख्य सचिव / सर्व प्रधान सचिव / सचिव मंत्रालयीन विभाग
८. प्रधान सचिव (नियोजन विभाग) मंत्रालय,मुंबई.
९. सर्व मंत्रालयीन विभाग,मंत्रालय,मुंबई
१०. सदस्य सचिव, विदर्भ वैधानिक विकास मंडळ, बी-२३/ए, साउथ अंबाझरी मार्ग, अंध विद्यालयाजवळ, नागपूर
११. सदस्य सचिव,मराठवाडा वैधानिक विकास मंडळ, नविन प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय कंपाऊड, तळमजला,औरंगाबाद-४३१००१
१२. सदस्य सचिव,उर्वरित महाराष्ट्र वैद्यानिक विकास मंडळ, नविन प्रशासकीय इमारत, १८,वा मजला, (पश्चिम बाजू) मंत्रालयासमोर,मुंबई-३२

१३. कार्यकारी अध्यक्ष, राज्य नियोजन मंडळ, नविन प्रशासकीय इमारत, १९ वा मजला, (पश्चिम बाजू), मुंबई
१४. सर्व विभागीय आयुक्त
१५. आयुक्त,आदिवासी विकास,नाशिक
१६. सर्व अपर आयुक्त,आदिवासी विकास
१७. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ,नाशिक
१८. आयुक्त,आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,पुणे
१९. संचालक,अर्थ व सांख्यिकी संचालनालय,मुंबई.
२०. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद
२१. सर्व विशेष कार्यकारी अधिकारी, विभागीय आयुक्तांची कार्यालये
२२. सर्व जिल्हा नियोजन अधिकारी
२३. सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
२४. मा.प्रधान सचिव (आ.वि.) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
२५. सर्व सहसचिव/ उप सचिव/ अवर सचिव/ कक्ष अधिकारी, आ.वि.वि, मंत्रालय,मुंबई.
२६. निवड नस्ती (का.६), आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

**“परिशिष्ट -अ”**

**आदिवासी घटक कार्यक्रम सन २०१८-१९ करिता नियतव्यय वाटप**

<table>
<tr><td colspan="3">सन २०१८-१९ करिता एकूण नियतव्यय रुपये ६७५४००.०० लाख</td></tr>
<tr><td colspan="3">त्यानुसार एकूण नियतव्ययाच्या ५% रू. ३३७७०.०० लक्ष निधी पेसा क्षेत्रातील ग्रामपंचायतींना थेट अनुदान तसेच जिल्हा व राज्य योजनांकरीता नियतव्यय वाटप खालीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे.</td></tr>
<tr><td colspan="2">जिल्हास्तर</td><td>राज्यस्तर</td></tr>
<tr><td colspan="2">रुपये ३०५३८९.९३ लाख</td><td rowspan="6">रुपये ३३६२४०.०७ लाख</td></tr>
<tr><td colspan="2">जिल्हास्तरीय नियतव्ययाचे वाटप दोन भागात खालीलप्रमाणे राहिल.</td></tr>
<tr><td>टिएसपी</td><td>ओटिएसपी</td></tr>
<tr><td>८५%</td><td>१५%</td></tr>
<tr><td>रुपये २५९५८१.४४ लाख</td><td>रुपये ४५८०८.४९ लाख</td></tr>
<tr><td>आदिवासी लोकसंख्येवर आधारित</td><td>सर्व ३६ जिल्हयांना १०० टक्के आदिवासी लोकसंख्येच्या प्रमाणात नियतव्यय वाटप करणे. वरील सुत्रानुसार ओटिएसपी क्षेत्रासाठी काही जिल्ह्यास मागणीपेक्षा जास्त नियतव्यय उपलब्ध होत असल्यास तो कमी करुन आदिवासी उपयोजना क्षेत्रातील संवेदनशिल प्रकल्पांना वाटप करण्यात येतो. त्याप्रमाणे सन २०१८-२०१९ या वर्षाकरिता रु.२०००.०० लक्ष एवढा अतिरिक्त नियतव्यय ए.आ.वि.प्र, जव्हार, डहाणू, अहेरी, भामरागड व गडचिरोली प्रकल्पांना उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.</td></tr>
</table>

## “परिशिष्ट-ब”

## जिल्हा वार्षिक आदिवासी घटक कार्यक्रम योजना २०१८-१९ करीता जिल्हानिहाय आर्थिक कमाल मर्यादा

(रू.लाखात)

| अ.क्र. | जिल्हयाचे नांव | टिएसपी+अेटीएसपी | माडा+मिनीमाडा | ओटीएसपी | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | मुंबई उपनगर | ०.०० | ०.०० | ६५८.६६ | ६५८.६६ |
| २ | मुंबई शहर | ०.०० | ०.०० | १५८.०७ | १५८.०७ |
| ३. | पालघर | ४५५९८.५० | ०.०० | ८६७.०१ | ४६४६५.५१ |
| ४. | ठाणे | ९४५३.९४ | ४७३.६५ | २१३९.३२ | १२०६६.९० |
| ५. | रायगड | १२५५.०१ | २१७१.९८ | २१६८.३५ | ५५९५.३४ |
| ६. | रत्नागिरी | ०.०० | ०.०० | १२८.३४ | १२८.३४ |
| ७. | सिंधुदूर्ग | ०.०० | ०.०० | ४३.९४ | ४३.९४ |
| ८. | नाशिक | ४११३१.६९ | १३४७.४८ | ५६८०.२५ | ४८१५९.४३ |
| ९. | धुळे | १४०८३.८८ | ०.०० | २८८५.१९ | १६९६९.०७ |
| १०. | नंदुरबार | ४५०२४.५७ | ०.०० | ६२५.७० | ४५६५०.२७ |
| ११. | जळगाव | २६३१.३३ | ०.०० | ४९१२.६६ | ७५४३.९९ |
| १२. | अहमदनगर | ५११७.०६ | २७५.५७ | २४१४.१२ | ७८०६.७४ |
| १३. | पुणे | ४५८१.०० | ७०७.९२ | २२४१.९२ | ७५३०.८४ |
| १४. | सातारा | ०.०० | ०.०० | १८६.६८ | १८६.६८ |
| १५. | सांगली | ०.०० | ०.०० | ११५.४९ | ११५.४९ |
| १६. | सोलापूर | ०.०० | ०.०० | ४८८.७८ | ४८८.७८ |
| १७. | कोल्हापूर | ०.०० | ०.०० | १९०.२८ | १९०.२८ |
|  | **उर्वरीत महाराष्ट्र** | १६८८७६.९९ | ४९७६.६० | २५९०४.७७ | १९९७५८.३६ |
| १८. | बुलढाणा | ०.०० | १५७७.५२ | ८३२.२१ | २४०९.७३ |
| १९. | अकोला | ०.०० | १३७८.२९ | ६७३.९० | २०५२.१९ |
| २०. | वाशिम | ०.०० | १२०८.८९ | ५३९.६४ | १७४८.५३ |
| २१. | अमरावती | १०५१३.८० | १६१७.७५ | १२६७.०६ | १३३९८.६० |
| २२. | यवतमाळ | ११६२६.३१ | २८५८.०५ | २३८२.६३ | १६८६६.९८ |
| २३. | नागपूर | १९७०.३४ | १८४५.८५ | ३३६८.४४ | ७१८४.६४ |
| २४. | वर्धा | ०.०० | ११२०.५० | १२०३.११ | २३२३.६१ |
| २५. | भंडारा | ०.०० | ७२८.६२ | ६८७.४३ | १४१६.०५ |
| २६. | गोंदिया | ६१६७.०८ | ७८६.३७ | ८५०.४२ | ७८०३.८८ |
| २७. | चंद्रपूर | १०२२०.६१ | २१७८.२० | १५७०.९९ | १३९६९.८० |
| २८. | गडचिरोली | २३४९५.४२ | ०.०० | ३४६.३६ | २३८४१.७८ |
|  | **विदर्भ** | ६३९९३.५७ | १५३००.०५ | १३७२२.१९ | ९३०१५.८१ |
| २९. | औरंगाबाद | ०.०० | ०.०० | ९०३.१२ | ९०३.१२ |
| ३०. | जालना | ०.०० | ०.०० | २६६.२३ | २६६.३३ |
| ३१. | बीड | ०.०० | ०.०० | २०६.१३ | २०६.१३ |
| ३२. | परभणी | ०.०० | ०.०० | २५५.२१ | २५५.२१ |
| ३३. | हिंगोली | ०.०० | २५५८.३१ | ३५८.९९ | २९१७.३० |
| ३४. | नांदेड | ४०३२.५४ | १८४३.३९ | १६०२.६८ | ७४७८.६१ |
| ३५. | उस्मानाबाद | ०.०० | ०.०० | २२७.०२ | २२७.०२ |
| ३६. | लातूर | ०.०० | ०.०० | ३६२.१४ | ३६२.१४ |
|  | **मराठवाडा** | ४०३२.५४ | ४४०१.७० | ४१८१.५३ | १२६१५.७७ |
|  | **एकूण राज्य** | **२३६९०३.१०** | **२४६७८.३४** | **४३८०८.४९** | **३०५३८९.९३** |

## “परिशिष्ट-क”

## जिल्हा वार्षिक आदिवासी घटक कार्यक्रम योजना २०१८-१९ करीता प्रकल्पनिहाय आर्थिक कमाल मर्यादा

(रू.लाखात)

| अ.क्र. | जिल्ह्याचे नांव | एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे नांव | टिएसपी+अेटीएसपी नियतव्यय | माडा+मिनीमाडा नियतव्यय | ओटीएसपी नियतव्यय | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पालघर | डहाणू | २५८२५.८१ | ०.०० | ८६७.०१ | २६६९२.८२ |
| | | जव्हार | १९७७२.६९ | ०.०० | ०.०० | १९७७२.६९ |
| | एकूण पालघर | | ४५५९८.५० | ०.०० | ८६७.०१ | ४६४६५.५१ |
| २ | नाशिक | नाशिक | २३११८.५४ | ९९०.११ | ३१८९.२९ | २७२९७.९४ |
| | | कळवण | १८०१३.१६ | ३५७.३७ | २४९०.९६ | २०८६१.४९ |
| | एकूण नाशिक | | ४११३१.६९ | १३४७.४८ | ५६८०.२५ | ४८१५९.४३ |
| ३ | नंदुरबार | नंदुरबार | २३४९१.३४ | ०.०० | ६२५.७० | २४११७.०४ |
| | | तळोदा | २१५३३.२४ | ०.०० | ०.०० | २१५३३.२४ |
| | एकूण नंदुरबार | | ४५०२४.५७ | ०.०० | ६२५.७० | ४५६५०.२७ |
| ४ | चंद्रपुर | चंद्रपुर | ५७२९.३४ | १३६०.९३ | ९८०.०४ | ८०७०.३० |
| | | चिमुर | ४४९१.२८ | ८१७.२७ | ५९०.९५ | ५८९९.५० |
| | एकूण चंद्रपुर | | १०२२०.६१ | २१७८.२० | १५७०.९९ | १३९६९.८० |
| ५ | गडचिरोली | अहेरी | ५१६८.८२ | ०.०० | ७.९६ | ५१७६.७८ |
| | | भामरागड | ६९३०.७३ | ०.०० | ०.०० | ६९३०.७३ |
| | | गडचिरोली | ११३९५.८७ | ०.०० | ३३८.४० | ११७३४.२७ |
| | एकूण गडचिरोली | | २३४९५.४२ | ०.०० | ३४६.३६ | २३८४१.७८ |
| ६ | यवतमाळ | पांढरकवडा | १००२७.०३ | ७२५.८५ | १२९६.३२ | १२०४९.२० |
| | | पुसद | १५९९.२८ | २१३२.२० | १०८६.३१ | ४८१७.७८ |
| | एकूण यवतमाळ | | ११६२६.३१ | २८५८.०५ | २३८२.६३ | १६८६६.९८ |

## “परिशिष्ट-ड”

## जिल्हा वार्षिक आदिवासी घटक कार्यक्रम २०१८-१९ विकासक्षेत्रनिहाय नियतव्यय वाटप मार्गदर्शक सूचना

सन २०१८-१९ जिल्हा वार्षिक आदिवासी घटक कार्यक्रम प्रारुप आराखडा तयार करताना खालील मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्यात यावे.

१) प्रस्तूत प्रकरणी संदर्भाधीन क्र.२ येथील दि.१३.१०.२०१७ रोजीच्या शासन निर्णया मधील तरतूदीनुसार जिल्हा वार्षिक योजना तयार करताना खालील प्रमाणे विकास क्षेत्रनिहाय नियतव्यय वाटप करण्यात यावे.

| अक्र. | विकास क्षेत्र | राखून ठेवावयाचा नियतव्यय (टक्केवारी) |
|---|---|---|
| १ | मागासवर्गीय कल्याण (विशेष क्षेत्र) | किमान ४३ % |
| २ | गाभा क्षेत्र | किमान ४० % |
| ३ | बिगर गाभा क्षेत्र | कमाल १५ % |
| ४ | नाविन्यपूर्ण योजना | कमाल ०२ % |
| **एकुण** | | **१०० %** |

२) उक्त तक्त्यात नमूद विकास क्षेत्रांतर्गत नियतव्यय वाटप करण्याकरीता खालील प्रमाणे उपविकास क्षेत्राचे वर्गीकरणा नुसार नियतव्यय निश्चित करण्यात यावा.

| गाभा क्षेत्र (Core) | बिगर गाभा क्षेत्र (Non Core) |
|---|---|
| (१) कृषी, फलोत्पादन, पशुसंवर्धन, मत्स्यसंवर्धन, वने | (१) नगर विकास |
| (२) ग्राम विकास | (२) पर्यटन व वन पर्यटन |
| (३) शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण, उच्च व तंत्र शिक्षण व कौशल्य विकास | (३) सहकार व वस्त्रोद्योग |
| (४) ग्रामीण पाणी पुरवठा | (४) वैद्यकीय शिक्षण |
| (५) आरोग्य | (५) जलसंपदा |
| (६) महिला व बालविकास-पोषण, अंगणवाडी बांधकाम | (६) रस्ते व पुल विकास |
| (७) जलसंधारण/लघु पाटबंधारे | (७) उद्योग व ऊर्जा |

३) **ज्या** जिल्हयात एकापेक्षा जास्त एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प आहेत, तेथील जिल्ह्याला देण्यात आलेल्या कमाल नियतव्ययामधून जो नियतव्यय प्रकल्पासाठी निश्चित करण्यात आलेला आहे, त्या नियतव्ययामध्ये त्या प्रकल्पाचा आदिवासी घटक कार्यक्रम बसवावयाचा आहे. तसेच जिल्ह्यासाठी निश्चित करुन देण्यात आलेल्या कमाल नियतव्ययाच्या मर्यादेमध्ये जिल्हयाचा आदिवासी जिल्हा उपयोजना बसवावयाचा आहे.

**४) ज्या** जिल्हयात एकापेक्षा जास्त प्रकल्प क्षेत्रे आहेत तेथे सर्व प्रकल्पांची एकत्रित योजना तयार करुन तो जिल्हा आदिवासी घटक कार्यक्रम नियोजन समितीकडे “परिशिष्ट-**ब”** मध्ये जिल्ह्याला दिलेल्या कमाल मर्यादेच्या अधिन राहून मंजूरीकरीता सादर करावयाचा आहे.

५) **योजना** तयार करताना ज्या योजनांना लेखाशिर्ष/उपशिर्ष उपलब्ध आहे, अशा योजनांना प्राधान्याने नियतव्यय उपलब्ध करुन द्यावा. तसेच तरतूद करताना त्या जिल्ह्यात सुरु असलेल्या योजनांसाठी नियतव्यय प्रस्तावित करण्यात यावा. ज्या योजना त्या जिल्ह्यांत सुरु नाहीत, अशा योजनांसाठी नियतव्यय प्रस्तावित करु नये.

६) **आदिवासी** घटक कार्यक्रमाचा प्रारुप आराखडा तयार करताना तेथील स्थानिक गरजा लक्षात घेवून तयार करण्यात यावा. तथापि, उर्जा क्षेत्रातील उच्च दाबाच्या पारेषण वाहिन्या टाकणे, राष्ट्रीय व राज्य महामार्ग इ. कार्यक्रमांसाठी जिल्हा वार्षिक आदिवासी घटक कार्यक्रमामध्ये तरतूदी करण्यात येऊ नयेत. तथापि, आदिवासी क्षेत्रातील अशा प्रकारच्या कामांना/ योजनांना जिल्ह्याच्या सर्वसाधारण योजनेमधून आवश्यक तेवढ्या तरतूदी उपलब्ध करुन घेण्याचे प्रयत्न करण्यात यावेत.

७) **जिल्हा** आदिवासी घटक कार्यक्रम तयार करतांना आदिवासी घटक कार्यक्रम क्षेत्र (अतिरिक्त आदिवासी घटक कार्यक्रम क्षेत्रासह) आणि माडा व मिनीमाडा क्षेत्र असलेले क्षेत्र वगळून उरलेल्या भागातील आदिवासीसाठी (ओटिएसपी) वैयक्तीक व कौटुंबिक लाभाच्या योजनेकरीता निश्चित अशी तरतूद संबंधित विकास क्षेत्राखाली स्वतंत्रपणे दाखविण्यात यावी. ज्या जिल्ह्यात आदिवासी घटक कार्यक्रम क्षेत्र आणि माडा व मिनीमाडा क्षेत्र नसेल त्या जिल्ह्यामध्ये सुध्दा ओटिएसपी करीता आवश्यक तेवढ्या प्रमाणात तरतूदी कराव्यात.

८) **आदिवासी** घटक कार्यक्रमामध्ये माडा आणि मिनीमाडा क्षेत्रासाठी मुलभूत सोयी उपलब्ध करुन देण्यासाठी नियतव्यय उपलब्ध करुन देण्यात येतो. तसेच ओटिएसपी ही संकल्पना आदिवासी उपयोजनेचाच एक भाग राहील. परंतू ओटिएसपी क्षेत्रातील खर्चाबाबतचे वेगळे अहवाल केंद्र शासनाला सादर करावे लागतात. म्हणून माडा व मिनीमाडा क्षेत्रातील मूलभूत सोयी व वैयक्तिक लाभाच्या योजनांसाठी उपलब्ध करुन दिलेला नियतव्यय हा ओटिएसपी या संकल्पनेत समाविष्ट करुन तसा दाखविण्यात यावा.

९) **जिल्ह्याला** आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत उपलब्ध करुन दिलेल्या तरतूदीपैकी त्या जिल्ह्यातील दुर्गम भागांसाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध व्हावा, या हेतूने असे कळविण्यात येते की, सदर जिल्ह्यातील इतर सर्वसाधारण आदिवासी भागाला जो निधी देय होईल, त्या निधीपेक्षा जास्त टक्केवारीने अतिदुर्गम भागासाठी नियतव्यय देण्यात यावा.

**उदा**. नंदूरबार जिल्ह्यातील तळोदा प्रकल्प क्षेत्रात एकूण ४ तालुके असून त्यापैकी अक्कलकुवा व अक्राणी या दोन तालुक्यांमध्ये अतिदुर्गम क्षेत्राचा समावेश आहे. म्हणून तळोदा प्रकल्पांतर्गत जर **१००**

रुपये नियतव्यय द्यावयाचा असेल तर त्यापैकी **९०%** लोकसंख्या व क्षेत्राच्या प्रमाणात ४ तालुक्यांना देय होईल व उर्वरित **१०%** नियतव्यय हा उपरोक्त दोन अतिदुर्गम तालुक्याला लोकसंख्येच्या व क्षेत्राच्या प्रमाणात वाढवून देण्यात यावा. अशा रितीने प्राप्त होणाऱ्या नियतव्ययामधून अतिदुर्गम क्षेत्रासाठी जोडरस्ते व इतर पायाभूत सुविधा देण्याकरिता आवश्यक ती तरतूद प्राथम्यक्रमाने करावी. तथापि, सदर नियतव्ययातून रस्ता दुरुस्ती (डांबरीकरण, खडीकरण, मजबूतीकरण, रुंदीकरण) या बाबीसाठी नियतव्यय उपलब्ध करुन देण्यात येऊ नये.

१०) **आदिवासी** घटक कार्यक्रमाखालील जिल्हा योजनांसाठी नियतव्यय निश्चित करताना योजनांसाठी नियतव्यय विहीत करु नये. आदिवासी घटक कार्यक्रमातील स्टेटपूल योजनेखालील योजनांसाठी राज्यस्तरावर स्वतंत्रपणे निधी देण्यात येईल.या अनुषंगाने खालील मार्गदर्शक सूचना विचारात घेण्यात याव्यात.

<u>अ) रस्ते व पूल</u>-

I) महाराष्ट्र राज्यातील न जोडलेल्या वाड्या-वस्त्या जोडण्यासाठी व ग्रामीण भागातील दुरावस्था झालेल्या रस्त्यांची दर्जोन्नती करण्यासाठी राज्यात आदिवासी क्षेत्रांतर्गत “मुख्यमंत्री ग्रामसडक योजना ” ग्राम विकास विभागामार्फत राबविण्यात येणार आहे. यानुषंगाने प्रथमत: जिल्ह्याची “मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत ” घेण्यात येणाऱ्या रस्त्यांची (CMGSY) गरज पूर्ण केल्यानंतरच जिल्ह्यांतर्गत इतर रस्तेविकास कामांची निवड करताना खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

II) आदिवासी क्षेत्रातील रस्त्यांच्या कामामध्ये फक्त लिंकरोड म्हणजे मुख्य रस्त्यापासून गाव जोडणाऱ्या रस्त्यांचा समावेश असावा. त्यामध्ये फक्त सी.डी. वर्क्स, लहान पूल, व लहान मोऱ्या यांचा समावेश असावा. आदिवासी लोकसंख्येच्या उतरत्या क्रमानुसारची गांवे घेण्यात यावीत. रस्ते जोडण्याच्या कार्यक्रमात बारमाही रस्ते कार्यक्रमाला प्रथम प्राधान्य देण्यात यावे. शिवाय, ज्या आश्रमशाळांना/ प्राथमिक आरोग्य केंद्र/ उपकेंद्रांना जोडरस्ते नाहीत तेथील कामांना अग्रक्रम द्यावा. जिल्हा रस्ते, रस्त्यांचे रुंदीकरण, स्टेट हायवे इ. साठी आदिवासी उपयोजनेतून निधी देण्यात येऊ नये.

III) आदिवासी उपयोजना क्षेत्रात माहे मार्च-२०१८ पर्यंत जिल्हानिहाय अर्थसंकल्पीत झालेल्या रस्त्यांसंदर्भात व सन २०१८-१९ मध्ये करावयाच्या कामांचा प्राधान्यक्रम सुरुवातीस निश्चित करण्यात यावा तसेच प्राध्यान्य क्रमानुसार नविन कोणती कामे यादीत घ्यावयाची आहेत त्यास लागणारा निधी याबाबत स्वतंत्र विवरणपत्र देण्यात यावे.

IV) रस्त्यांच्या कामांना प्रशासकीय मान्यता देताना यापुर्वीच्या प्रलंबित कामासाठी लागणारा निधी विचारात घेऊन त्या जिल्ह्यासाठी मंजूर केलेल्या नियतव्ययाच्या मर्यादेतच रस्त्यांच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात यावी जेणेकरून पुढील आर्थिक वर्षात तरतूदीअभावी देयके प्रलंबित राहणार नाहीत.

**आ) <u>शिक्षण</u> :-**

I) मागासवर्गीयांचे कल्याण (आ.वि.वि.) या उपक्षेत्रात अनुसुचित जमातीच्या विद्यार्थांना सूवर्ण महोत्सवी शिष्यवृत्ती योजना व अनुसुचित जमातीच्या विद्यार्थीनींची गळती थांबविण्यासाठी प्रोत्साहन भत्ता अशा

दोन समान योजना राबविण्यात येत आहेत. त्यापैकी आदिवासी विकास विभागाची शिष्यवृत्तीची योजना अधिक लाभदायक असल्यामुळे शिक्षण विभागाच्या योजनांसाठी नियतव्यय ठेवण्यात येऊ नये.

II) प्री मॅट्रीक व पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजनेसाठी आवश्यक तेवढी तरतूद प्राथम्याने उपलब्ध करून द्यावी तसेच शासकीय आश्रमशाळा दुरूस्ती व वसतीगृह दुरूस्तीसाठी आवश्यक तरतूद करण्यात यावी.

III) अनुदानित आश्रमशाळांसाठी पुरेशी तरतूद न केल्यामुळे त्यांचे मागील वर्षाचा निधी प्रलंबित आहे. सबब मागील देय रकमांसह पुढील वर्षी अनुदानित आश्रमशाळांसाठी पुरेशी तरतूद करण्याची जबाबदारी प्रकल्प अधिकारी व जिल्हाधिकारी यांची राहील.

IV) शासनाचे महिला विषयक नवीन धोरण लक्षात घेऊन त्यांचे करीता असलेल्या सर्व योजनांकरीता आवश्यक तरतूद ठेवण्यात यावी.

**इ) लघु पाटबंधारे (१०१ ते २५० हेक्टर)-**

जलसंपदा विभाग व जलसंधारण विभागामार्फत जिल्हास्तरावर करण्यात येणारी १०० हेक्टरच्या वरील लघु पाटबंधाऱ्यांची कामे ही योजना सन २०१६-१७ पासून जिल्हास्तरावरून राज्यस्तरावर वर्ग करण्यात आलेली आहे. तथापि, सन २०१६-१७ पूर्वी जिल्हास्तरावर योजना सूरू असताना मंजूर प्रशासकीय मान्यतेपैकी फक्त उर्वरीत दायित्वाकरीता एकूण जिल्हा नियतव्ययाच्या कमाल १% निधी प्रस्तावित करावा. याशिवाय कोणत्याही नविन कामांकरीता जिल्हास्तरावरून मान्यता देण्यात येऊ नये. तसेच दायित्वांच्या कामांचा निधी जिल्हा प्रारूप आराखड्यात प्रस्तावित करताना सदर कामांची प्रशासकीय मान्यता, कामांवर आतापर्यंत झालेला खर्च, उर्वरीत आवश्यक तरतूद तसेच अनुषंगिक तपशिल इ. जिल्हा प्रारूप आराखड्यासोबत सविस्तर सादर करावा. तसेच उर्वरीत दायित्त्वाकरीता निधी खालील तक्त्यातील लेखाशिर्षांसमोर प्रस्तावित करावा.

| अ.क्र | मुख्य लेखाशिर्ष २७०२- लहान पाटबंधारे -जलसंपदा विभाग (ल.पा. १०१ ते २५० हेक्टर) | दायित्वाकरीता निधी प्रस्तावित करण्यासाठी पूर्वीचे लेखाशिर्ष (सध्याचे उपशिर्ष) |
|---|---|---|
| १ | इतर लहान पाटबंधाऱ्यांचे (राज्यक्षेत्र) सर्वेक्षणाची कामे | २७०२ ३६८७ (TI१३०००१) |
| २ | स्वेच्छाधीन अनुदान (विस्तार व सुधारणा) | २७०२ ३६९६ (TI१३०००२) |
| | **मुख्य लेखाशिर्ष ४७०२- लहान पाटबंधारे यावरील भांडवली खर्च -जल संधारण विभाग** | |
| १ | लहान पाटबंधाऱ्यांची कामे-कोल्हापूर पध्दतीचे बंधारे (१०१ ते २५० हेक्टर) | ४७०२ ३६७१ (TL१८०००४) |
| २ | लघु पाटबंधारे कामांचे अन्वेषण व सर्वेक्षण (कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यांसह) (१०० हेक्टरच्या वरील) | २७०२ १५५९ (TL१७००१०) |

## ई) <u>पोषण –</u>

सदर उपशिर्षातर्गत भारतरत्न डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजनेतर्गत गरोदर स्त्री व स्तनदा मातांना एक वेळ चौरस आहार तर टप्पा-२ अंतर्गत ७ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना अंडी/ केळी/ ऋतुमानानुसार फळ देण्याची योजना कार्यरत आहे. या करीता या विभागाकडून तसेच महिला व बाल विकास विभागाकडून एकत्रितरित्या जिल्हानिहाय प्रत्यक्षात लागणारी तरतूद कळविण्यात येईल. सदर तरतूदीच्या अनुषंगाने तेवढ्या मागणीचा समावेश जिल्हा योजनेमध्ये करावा. सदर योजनांचा निधी जिल्हानिहाय मागणीनुसार अर्थसंकल्पित झाल्यानंतर जिल्हानिहाय विनियोगासाठी आयुक्त, महिला व बालविकास यांना उपलब्ध करून देण्यात येईल. याबाबत प्रकल्प अधिकारी, ए. आ.वि.प्र, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी व जिल्हाधिकारी यांनी विशेष दक्षता घ्यावी. या योजनेकरीता **"भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना (TX२९०००४)"** या नविन उप शिर्षाखाली निधी अर्थसंकल्पित करण्याची दक्षता घ्यावी.

**११)** आदिवासी उपयोजनेमधून १) आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम २) डोंगरी विकास कार्यक्रम व ३) रोजगार हमी योजना व संसद आदर्श ग्राम योजनाकरिता जिल्हानिहाय तरतूदी ठेवण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे या कार्यक्रमासाठी नियतव्यय देण्यात येऊ नये. यासाठीचा नियतव्यय सर्वसाधारण योजनेतून उपलब्ध करुन घ्यावा.

**१२) "मागासवर्गीयांचे कल्याण" (विशेष क्षेत्र) या विकासशिर्षाखाली किमान ४३%** नियतव्यय राखून ठेवावयाचा आहे. त्यामधून मागासवर्गीयांचे कल्याण अंतर्गत येणाऱ्या योजनांसाठी किती नियतव्यय प्रस्तावित करण्यात यावा, याविषयी आयुक्त, आदिवासी विकास यांच्याकडून स्वतंत्र मार्गदर्शक सूचना प्रसृत केल्या जातील. त्यानुसार शासकीय आश्रमशाळा, शासकीय वसतिगृहे, अनुदानित आश्रमशाळा यांचे परिरक्षण, शिष्यवृत्ती, निर्वाह भत्ता, तेलपंप व वीजपंप इ. योजनांकरिता आवश्यक तेवढा निधी प्राथम्याने उपलब्ध करुन देण्यात यावा.

**१३) जिल्ह्याला** टिएसपी क्षेत्रासाठी व माडा, मिनी माडासाठी जो नियतव्यय उपलब्ध करुन देण्यात आला आहे, त्यामधून त्या क्षेत्रात राहणाऱ्या आदिवासींच्या वैयक्तिक व कौटुंबिक लाभाच्या योजनांकरिता २०% प्रमाणे व त्या क्षेत्रातील पायाभूत सुविधा निर्माण करण्याकरिता योजनांवर ८०% या प्रमाणे शासनाच्या धोरणानुसार खर्च करावयाचा आहे. म्हणून त्या दृष्टीने आवश्यक तेवढा निधी उपलब्ध करुन देण्याची दक्षता घेण्यात यावी. या शिवाय जिल्ह्यातील ओटीएसपीसाठी ठरवून देण्यात आलेल्या नियतव्ययातून आदिवासींच्या फक्त वैयक्तिक अथवा कौटुंबिक लाभाच्या योजनांकरिता फलदायी व निवडक योजनांसाठी नियतव्यय दिला जाईल, याची दक्षता घेण्यात यावी.

**१४) सर्व अंमलबजावणी** अधिकाऱ्यांनी नियोजन समितीने मान्य केलेल्या योजनांवरील प्रत्यक्ष खर्चावर आधारित मासिक खर्चाचे विवरणपत्र संबंधित विभाग प्रमुख/ प्रशासकीय विभागामार्फत आदिवासी विकास विभागास सादर करावे.

**१५) जिल्हयातील** संवेदनशील तालुक्यांसाठी त्या त्या जिल्ह्यांकरिता उपलब्ध करुन देण्यात आलेल्या नियतव्ययापैकी २०% नियतव्यय बाजूला काढून तो संवेदनशील तालुक्यांमध्ये समप्रमाणात अतिरिक्त नियतव्यय म्हणून वाटून देण्यात यावा.

---------------

## "परिशिष्ट- इ"

## सन २०१८-२०१९ चा जिल्हा वार्षिक आदिवासी घटक कार्यक्रम तयार करण्याचे वेळापत्रक

| अ.क्र. | कार्यवाही पूर्ण करावयाचा दिनांक | कार्यवाहीचा टप्पा पूर्ण करणे |
|---|---|---|
| १ | दि.०५/११/२०१७ | अंमलबजावणी अधिकारी आदिवासी जिल्हा योजनांचे प्रस्ताव पाठविणे व त्यांची MP-SIMS मध्ये नोंदणी करणे. |
| २ | दि.१५/११/२०१७ | प्राप्त झालेल्या प्रस्तावांचे / योजनांचे जिल्हा नियोजन अधिकाऱ्यांनी एकत्रिकरण करुन जिल्हा आदिवासी योजनेचे प्रारुप तयार करणे. |
| ३ | दि.३०/११/२०१७ | जिल्हा नियोजन समित्यांनी आदिवासी उपयोजनेच्या प्रारुपास मान्यता देणे व राज्यस्तरीय बैठकीत प्रारुप आराखडा ठेवण्यासाठी शिफारस करणे. |
| ४ | दि.१०/१२/२०१७ | जिल्हाधिकारी कार्यालयाने आदिवासी विभागाकडे जिल्हा योजनांचा प्रारुप आराखडा पाठविणे. |
| ५ | दि.२६/१२/२०१७ ते दि.०५/०१/२०१८ | मा.मंत्री (आदिवासी) यांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय बैठकीत जिल्हा नियोजन समितीच्या प्रतिनिधींबरोबर जिल्हानिहाय चर्चा करुन जिल्हा योजनेस अंतिम स्वरुप देणे. |

विवरणपत्र - १

प्रारुप वार्षिक आदिवासी घटक कार्यक्रम सन २०१८-१९ च्या प्रस्तावित नियतव्ययाचा गोषवारा.

जिल्हा :- (रुपये लाखात)

| अ.क्र. | क्षेत्र/उपक्षेत्र | अंमलबजावणी अधिकारी | सन २०१६-१७ | | सन २०१७-१८ | | सन २०१८-१९ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मंजूर नियतव्यय | मार्च, २०१७ अखेरचा खर्च | मंजूर नियतव्यय | अपेक्षित खर्च | अंमलबजावणी अधिकाऱ्यांनी प्रस्तावित केलेला नियतव्यय | कमाल आर्थिक मर्यादेनुसार प्रस्तावित केलेला नियतव्यय | त्यापैकी भांडवली खर्च |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १ | पीक संवर्धन | | | | | | | | |
| २ | फलोत्पादन | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | | |
| ४ | | | | | | | | | |
| **एकूण** | | | | | | | | | |

टिप :- १) वरील स्तंभ २ मध्ये सदर शासन परिपत्रकाच्या **परिशिष्ट "ड"** मध्ये दर्शविलेल्या गाभा क्षेत्र व बिगर गाभा क्षेत्रातील उपक्षेत्रे घ्यावीत.

२) सन २०१७-१८ चा मंजूर नियतव्यय आदिवासी विकास विभागाने काढलेल्या जिल्हा वार्षिक घटक कार्यक्रम / वित्त विभागाचे प्रकाशन **"परिशिष्ठ ग "** पुस्तकात दर्शविल्याप्रमाणे असावा.

३) स्तंभ ९ ची एकूण बेरीज जोडपत्र-१ मध्ये जिल्ह्यास दिलेल्या सिलिंग इतकी असावी.

<u>विवरणपत्र-२</u>

<u>प्रारुप वार्षिक आदिवासी उपयोजना सन २०१८-१९ च्या विकास क्षेत्रामधील योजना/ प्रकल्प यासाठी प्रस्तावित नियतव्यय आणि भौतिक उद्दिष्टे</u>

| अ.क्र. पुस्तिकेतील क्र. योजना क्र. | विकासक्षेत्र/ उपक्षेत्र/ योजनेचे/ प्रकल्पाचे नांव | प्रशासकीय विभाग व अंमलबजावणी अधिकारी | सन २०१७-१८ | | सन २०१८-१९ | | | भौतिक उद्दिष्टे/साध्य | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मंजूर नियतव्यय | अपेक्षित खर्च | अंमलबजावणी अधिकाऱ्यांनी प्रस्तावित केलेला नियतव्यय | कमाल आर्थिक मर्यादेनुसार प्रस्तावित केलेला नियतव्यय | त्यापैकी भांडवली खर्च | बाब | परिमाण | २०१७-१८ | | २०१८-१९ |
| | | | | | | | | | | उद्दिष्टे | साध्य | प्रस्तावित उद्दिष्टे |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| | | | | | | | | | | | | |
| एकूण | | | | | | | | | | | | |

**<u>टिप</u> :-** १) स्तंभ ४ ची एकूण २०१७-१८ च्या आदिवासी विकास विभागाने काढलेल्या पुस्तिकेत दर्शविल्याप्रमाणे नियतव्ययाची आकडेवारी असावी.

२) स्तंभ ७ ची एकूण जिल्ह्याला दिलेल्या सिलिंग इतकी असावी.

## विवरणपत्र-३

## जिल्हा नियोजन समितीच्या अखत्यारित येणाऱ्या बाह्य सहाय्यित प्रकल्पांसाठी लागणारा नियतव्यय

(रुपये लाखात)

| अ.क्र. | बाह्य सहाय्यित प्रकल्पाचे नांव | प्रकल्पाची मुदत | प्रकल्पाची एकूण अंदाजित किंमत (अलीकडील सुधारित) | एकूण मंजूर विदेशी अर्थसहाय्य | २०१६-१७ पर्यंत झालेला एकूण खर्च | २०१७-१८ मध्ये अपेक्षित खर्च | प्रकल्पाची उर्वरित अंदाजित किंमत [४-(६+७)] | सन २०१८-१९ साठी प्रस्तावित नियतव्यय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| | | | | | | | | |

विवरणपत्र-४

जिल्हा नियोजन समितीच्या अखत्यारित येणाऱ्या केंद्र शासन पुरस्कृत योजनांसाठी लागणारा नियतव्यय

(रुपये लाखात)

| अ.क्र. | योजनेचे नांव व केंद्र व राज्य यांच्यामध्ये खर्चाच्या हिश्श्याचे प्रमाण | सन २०१६-१७ मध्ये झालेला खर्च | | | सन २०१७-१८ मधील मंजूर नियतव्यय | | | सन २०१८-१९ साठी प्रस्तावित नियतव्यय | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | राज्य हिस्सा | केंद्र हिस्सा | एकूण | राज्य हिस्सा | केंद्र हिस्सा | एकूण | राज्य हिस्सा | केंद्र हिस्सा | एकूण |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| | | | | | | | | | | |
| | एकूण | | | | | | | | | |

**टिप :-** १) स्तंभ २ मध्ये जिल्हा योजनेतील सर्व उपक्षेत्रातील योजना घ्याव्यात.

२) राज्य हिस्सा म्हणजे जिल्हा योजनेंतर्गत २०१७-१८ साठी मंजूर नियतव्यय व २०१८-१९ साठी प्रस्तावित नियतव्यय दर्शवावा.

३) केंद्र हिस्सा नियतव्यय योजनेच्या खर्चाच्या प्रमाणानुसार दर्शवावा. सन २०१६-१७ बाबत केंद्र हिश्श्याचा प्रत्यक्ष खर्च दर्शवावा.

# विवरणपत्र-५

## विदर्भ, मराठवाडा व कोकण या विभागांच्या जलद विकासासाठी कालबध्द कार्यक्रमांसाठी प्रस्तावित केलेला नियतव्यय

(रुपये लाखात)

| अ.क्र. | कार्यक्रमाचे नांव | २०१६-१७ | | २०१७-१८ | | २०१८-१९ |
|---|---|---|---|---|---|---|
| | | नियतव्यय | खर्च | नियतव्यय | खर्च | प्रस्तावित नियतव्यय |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |